लोकमत

छायांकित

ऑरेंज सिटी

# तंबाखूचे व्यसन सोडविण्यासाठीही 'एम्स'चा पुढाकार



**नागपूर :** तंबाखूमुळे मुख कर्करोग होण्याचा सर्वांत जास्त धोका असतो. शिवाय जीभ, गाल, घसा, अन्ननलिकेचा कर्करोग होण्याचीही भीती असते. तंबाखू हा हृदयासाठीही धोकादायक ठरतो. त्यामुळे तंबाखूचे घातक व्यसन सोडविण्यासाठी आता अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेनेही (एम्स) पुढाकार घेतला आहे. तंबाखूमुक्त केंद्र उघडण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन आयुषमंत्री प्रतापराव गणपतराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. सिद्धार्थ दुभाषी, डॉ. रसिका गडकरी, डॉ नितीन मराठे, डॉ सुयोग व्ही. जयस्वाल, डॉ. रंजन सोलंकी व डॉ. गौरव सिंग आदी उपस्थित होते. या केंद्राचे व्यवस्थापन मानसोपचार विभाग व सामुदायिक औषध विभागाच्या सहकार्याने केले जाणार आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 'तंबाखूमुक्त युवा अभियान २.०' चा भाग म्हणून हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामधून समुपदेशन व औषधोपचारही केला जाणार आहे.